करिता फंड करीत असलेले कार्य पुढे जाते अशी फंडाची भावना आहे व अशा संस्था फंडाशीं सलग्न झाल्या तर फंड त्यांना शक्य ती मदत करण्यास तयार आहे.

### फंडाच्या शाखा

फंडाच्या नियमामध्यें मद्रास शहर व बाहेरली ठिकाणीं निरनिराळ्या केन्द्रात फंडाच्या शाखा स्थापन करण्याची तरतूद आहे. स्थानिक कमिटी व शाखा चिटणीस नेमल्यावर मॅनेजिंग कमिटी शाखेस काहीं काम वाटून देते. मॅनजिंग कमिटी व बोर्ड ऑफ डायरेक्टर्स याच्या सर्व सभाची शाखा चिटणिसाला नोटीस मिळते व या सभाना हजर राहून वादविवादात भाग घेण्याचा त्यास अधिकार आहे, त्यास मताधिकार मात्र नाहीं. अशा शाखा सध्या तंजावर, त्रिचनापल्ली कोइमतूर व मुंबई येथे निघाल्या आहेत. दुसऱ्या काहीं केन्द्रात लवकरच फंडाच्या शाखा निघतील अशी आशा आहे.

---

## ६

## फंडाचे कांहीं सहाय्यकर्ते व दिवंगत मित्र

फंडाच्या सहाय्यकापैकीं काहीं रौप्यमहोत्सव पहाण्यास आज हयात नाहींत अशापैकीं काहींचा उल्लेख योग्य वाटल्यावरून तो येथे करीत आहे.

रावसाहेब पी. रामचद्रराव बी. ए. हे फंडाचे पहिले उपाध्यक्ष (१९१२-२०) होते. त्याच्या मृत्यूमुळें (१९२०) फंडाचे अपरिमित नुकसान झाले. त्याची कर्तव्यनिष्ठा व सचोटी वाखाणण्यासारखी होती. त्याचा स्वभाव शात असून करारी होता. फंडाच्या बाल्यावस्थेंत फंडाला त्याचा फार उपयोग झाला. त्याच्या निधनानतर त्याच्या कुटुबातील इतर मडळी फंडास उत्साहाने मदत करीत आहेत हे लिहिण्यास आनंद वाटतो.

दि. ब. के. कृष्णस्वामीराव, सी. आय. ई. हे फंडाचे पहिले (१९१२–२३) अध्यक्ष होते. फंडाच्या सुरुवातीपासून स्वतः इहलोक सोडून जाईपर्यंत अकरा वर्षे अध्यक्षाचें काम करून त्यानीं फंडावर अगणित उपकार करून ठेवले आहेत. ' त्याच्यासारखी पुराणमतवादी, परतु मोकळ्या मनाची, प्रेमळ व दयाळू माणसे दुर्मिळ आहेत. कोणच्याही सभेत ते रागावले आहेत किंवा त्याच्या कपाळावर कधीं आठ्या पडल्या आहेत. असें कधीं झालें नाहीं. कोणच्याही समाजसेवा करणाऱ्या संस्थेला ते उत्कृष्ट अध्यक्ष होते. शिष्यवृत्ति मागणारा गरीब विद्यार्थी थोड्या रुपड्याची गरज असलेला मुलगा नसून महत्सकटातून बाहेर पडण्यास तळतळणारा आत्मा आहे, त्याला मदत केल्यानें परमेश्वर सतुष्ट होतो व स्वतःचेंही समाधान होते अशा भावनेनें ते वागत. त्यानीं फंडाच्या कार्यास सुरुवातीपासून चागली पद्धति लावून दिली. तें. काहींही विसरत नसत पण सर्वांस क्षमा करण्यास सदैव तयार असत. हा दुर्मिळ गुण त्याच्यासारख्या सुसस्कृत व धार्मिक माणसातच आढळतो.

दि. ब. आर. रामचद्रराव हे १९२३ सालीं दि. ब. के. कृष्णस्वामिराव यांच्या मृत्यूमुळें रिकाम्या झालेल्या जागीं अध्यक्ष झाले. फंडाचे हे दुसरे अध्यक्ष असून ते उदारमतवादी होते. त्याच्या व पहिल्या अध्यक्षाच्या स्वभावात जमीन-अस्मानाचें अंतर होते. आपल्या राष्ट्रीय वृत्तीशीं प्रान्तिक किंवा जातीय सकुचित वृत्ति विसगत आहे असें याचें मत असल्यामुळें पहिल्या प्रथम काहीं वेळ ते फंडापासून अलिप्त राहिले होते. मी त्याना पुष्कळदा भेटून त्याचें मन फंडा-

कडे वळविलें व पुढें ते फंडाचे तहहयात सभासद झाले. थोडा वेळ कांकू केल्यावर ते अध्यक्ष होण्यास कबूल झाले. कमिटीच्या सभा फंडाचे कचेरींत भरल्या पाहिजेत यावर त्यांचा कटाक्ष असे. त्यांच्या कारभारांतील अनुभवाचा फायदा घेऊन फंड जास्त कार्यक्षम झाला यात शंका नाहीं.

श्री. सी. भीमराव हे फंडाच्या पहिल्या सभेस हजर राहिलेल्या लोकांपैकीं एक होते. त्रिप्लिकेन येथील महाराष्ट्र सभेच्या कार्यकर्त्यांपैकी ते एक होते. त्यांच्या अनुभवाचा फंडास फार फायदा झाला. ते फंडाचे पहिले खजिनदार झाले, फंडाची लोकप्रियता वाढविण्यास त्यांनीं पुष्कळ श्रम घेतले होते.

गेल्या पचवीस वर्षांच्या काळाकडे दृष्टि फेकली असता उदार चांगल्या व दयाळू मित्रांनीं फंडाचें काम यशस्वी होण्यास मदत केली, व जे फंडाचा रौप्यमहोत्सव पहाण्यास आज हयात नाहींत अशा पुष्कळांचीं नांवें दृष्टिपथात येतात. त्या सर्वांचा उल्लेख करणें या लहान लेखात शक्य नाहीं तरी त्यांनीं केलेल्या मदतीबद्दल फंड त्या सर्वांचा सदैव ऋणी राहील.

सध्या हयात असलेल्या फंडाच्या सहाय्यकांकडून व मित्रांकडून मला फार मदत झालेली आहे. या सहाय्यकांच्या उत्कृष्ट व अहर्निश मदतीमुळें फंडाचा रौप्यमहोत्सव करण्याचा सुदिन उगवला; फंडाला असेंच सहाय्य मिळून या मित्रांपैकीं पुष्कळांना फंडाचा सुवर्ण-व हीरक महो-महोत्सवही पाहाण्याचा योग घडो अशी जगन्नियंत्यापाशींप्रार्थना आहे.

## समारोप.

साराश, गेल्या पचवीस वर्षांत अडचणीस न जुमानता फंडाचें पाऊल पुढें पडत आहे. पुष्कळदा मोठ्या कडाक्याचे वादविवाद फंडाच्या कार्यकर्त्यांत झाले, फंडाचा मुख्य कार्यकर्ता या नात्यानें मला फंडाचे हित डोळ्यात तेल घालून जपावे लागे. या काळांत शक्य तितकें व्यक्तिभाव-रहित वृत्तीनें वागण्याचा प्रयत्न केला, कारण तत्वाबद्दल किंवा कार्यपद्धतीबद्दल मतभेद होते. या लेखाचे शेवटीं परिशिष्ट ' अ ' मध्यें फंडाचे पचविसाचें तक्तापत्रक दिले आहे, त्यावरून फंडाच्या गेल्या पंचवीस वर्षांच्या कार्याची कल्पना वाचकांस येईल. परिशिष्ट ' ब ' मध्यें फंडाची प्रगति वर्षानुवर्ष कशी होत गेली हे दाखविलें आहे. प्रसिद्ध महाराष्ट्रीय स्त्रीपुरुष संस्थेला मदत करीत आहेत, संस्था रजिस्टर झालेली आहे, व शंभरापेक्षा जास्त कृतज्ञ अशा शिष्यवृत्ति मिळालेल्या लोकांचें फंडाला सहाय्य आहे; इतके असल्यावर फंडाला जास्त चांगले दिवस येतील यात शंकाच नाहीं. हा इतिहास लिहितांना घडलेल्या गोष्टी निःपक्षपातानें लिहिण्याचा मी प्रयत्न केला आहे. यात कांहीं उणें असल्यास तो दोष माझ्या लेखणीचा आहे, हृदयाचा नाहीं.

आपले उद्देश कोणाला महत्त्वाकांक्षी वाटतील; आमचें कार्य अपेक्षेप्रमाणें झालें नसेल; पण आम्ही आशा व श्रद्धा याचे बळावर कार्य करीत आहोत. आमच्या समाज सुधारण्याच्या आमच्या प्रयत्नांस परमेश्वर यश देवो अशी त्याच्या चरणीं प्रार्थना आहे.

(३) श्री. टी. रामचंद्रराव, बी. ए. १९२०-२७
(४) रा. सा. सी. पुरुषोत्तम राव, १९२७-२९
(५) श्री. टी. रामचद्र राव, बी ए. १९२९-३०
(६) श्री. एस. अप्पूराव, बी ए. बी. एल. १९३०-३२
(७) श्री. आर. कृष्णराव, ,, ,, ,, ,, १९३२-३३
(८) श्री. टी. एम. रामचद्र राव, एम. ए. बी. एल. १९३३-३४
(९) श्री. टी. रामचद्र राव, बी. ए. १९३४-३६
(१०) श्री. सी. एस. राम रावसाहेब, बी' ए. बी. एल. १९३६-

## दुय्यम चिटणीस

(१) श्री. सी. भीमराव १९१२-१८
(२) श्री. आर. कृष्णराव, बी. ए. बी. एल. १९१८-२१
(३) श्री. टी. आप्पाजी राव, बी. ए बी एल. १९२१-१७
(४) श्री टी. रामचद्र राव, बी ए १९२७-२९
(५) श्री. ए. एस. कृष्णराव, एम. ए. १९२९-३३
(६) श्री. डी. राजाराम राव १९३३-३६
(७) श्री टी. रामचद्र राव बी. ए. १९३६-

## भाषा-विभाग (दुय्यम चिटणीस)

( १ ) श्री. टी. आप्पाजीराव बी. ए बी एल् १९२०-२१
( २ ) श्री. आर. हरिराव, बी. ए. एल् टी १९२१-२२.
( ३ ) श्री टी एन स्वामीनाथ नायग १९२२-२३.
( ४ ) श्री. टी. एन. भीमराव एम. ए एस टी. १९२३-२९
( ५ ) श्री. टी. आप्पाजीराव, बी ए बी एल. १९२९-३३.
( ६ ) श्री. टी. जे लक्ष्मणराव १९३३-३६
अकाउन्टन्ट—श्री. डी राजारामराव १९३६—
रेकॉर्ड कीपर व सेफ कस्टोडिअन—श्री आर. कृष्णराव, बी. ए. बी. एल. १९३६—
मेम्बर-इन-चार्ज ऑफ स्कॉलर्शिपहोल्डर्स—श्री. ए एस कृष्णराव, एम.ए. १९३६—
सामाजिक व वाङ्मयविषयक कार्यवाह—श्री. एन. आर. केदारीराव, एम. ए. एल. टी —१९३६.
शाळेचे कार्यवाह—श्री. पी जीवनराव, १९३६—
इमारत खात्याचे कार्यवाह—डॉ. पी. सुन्दरराव, एल्. एम. पी. १९३६—

## मॅनेजिंग कमिटीचे इतर सभासद.

( १ ) श्री. टी. टी. भवानीस्वातिराव बी. ए एल. टी. १९१३-१५;
( २ ) श्री. पिंगळे सुब्बाराव बी. ए. १९१३-१९१५,
( ३ ) श्री. एस. एम पुणतांबेकर १९१५-१८,
( ४ ) श्री. जी. आर. दादास्वामीराव १९१५-१८

( ५ ) श्री. टी. रामचंद्रराव बी. ए. १९१८, १९३०–३४;
( ६ ) श्री. एन. रामचंद्रराव १९१८–२१,
( ७ ) श्री. सी. भीमराव १९२०–२१,
( ८ ) श्री. टी एन भीमराव एम ए एल् टी. १९२१–२३
( ९ ) श्री. टी एस. कृष्णराव बी. ए १९२१–२५,
( १० ) श्री. एन. आर केदारीराव एम ए. एल् टी. १९२३–२९
( ११ ) श्री के. साम्बसदाशिवराव बी. ए १९२५–२६,
( १२ ) श्री. पी. देवराजराव १९२७–३६
( १३ ) श्री. पी के भुजगराव १९२९–३०;
( १४ ) श्री टी एस. सुंदरराव १९३३–३६.

## शाखांचे चिटणीस.

( १ ) श्री एन व्ही. गोविंदराव, मुंबई १९२१–३६,
( २ ) श्री डी. बी नागराजराव, कोईमतूर १९२४—
( ३ ) श्री. आर. सुब्बाराव, बी. ए. बी एल् त्रिचनापल्ली १९२५–२८
( ४ ) श्री जे. आर. डोणकर त्रिचनापल्ली १९२८–३१,
( ५ ) श्री टी. ए. माधवराव, त्रिचनापल्ली १९३७––
( ६ ) श्री. के कृष्णमूर्तिराव, पदुकोटा १९२८–३२,
( ७ ) श्री के रामराव बी. ए. एल् बी पदुकोटा १९३२–३
( ८ ) श्री सी एन. राममूर्ति, बी ए. बी एल. बंगलोर १९३२–३३,
( ९ ) श्री. के गोपाळराव तंजावर १९३७––

## भाषा–कमिटी.

श्री. आर. कृष्णराव बी. ए. बी एल्. १९२०–२१, १९२४–३०, श्री. सी. भीमराव १९२०–२१ श्री टी. गोपीनाथराव १९२०–२१, श्री टी. एन. स्वामिनाथ नायग १९२०–२३, श्री. आर हरिराव, बी ए एल. टी १९२०–२३ श्री. टी. एन. भिमराव, एम. ए एल टी १९२१–२७, श्री. टी एस. शंकरराव बी. ए. १९२१–२४ श्री. जी कृष्णराव १९२१–२३, १९३६—, श्री आर. वासुदेवराव, बी. ए. बी. एल्. १९२४–३०. श्री. आर. वेंकटराव, बी ए १९२४–३३, रा सा. टी. हरिराव बी. ए. १९२४–२९. श्री. टी. आप्पाजीराव, बी. ए. बी. एल. १९२७, श्री. टी. विठ्ठलराव, बी. ए १९२९–३० श्री जी आर दादास्वामीराव १९३०–३३, श्री. पी. सुब्रह्मण्यराव १९३०–३३. श्री आर. कृष्णस्वामीराव, बी. ए बी. एस. १९३०–३३, श्रीमती ताराबाई सहस्त्रबुद्धे १९३१. श्री. टी. जे. लक्ष्मणराव १९३३; श्री पी. देवराजराव १९३३, श्रीमती मंगळाबाई पुणतांबेकर १९३३–३४ श्रीमती गोदावरीबाई १९३६–, श्री. एन. आर. केदारीराव एम. ए. एल् टी १९३६—, श्री. पी. जिवनराव २९३६—, श्री. एस, विश्वनाथराव एम. ए. १९३६—,

## डायरेक्टर ( स्थानिक ).

रा. ब. सी. नागोजीराव, बी. ए. १९१२–१५, श्री. एस. शंकरराव १९१२–१५ रा. ब. कृष्णस्वामिराव, बी. ए. १९१२–२०; श्री. टी. टी भवानीस्वामीराव, बी. ए एल्. टी. १९१५, श्री. टी. व्ही. तुळजिरामराव, १९१२–१५; श्री. आर. लक्ष्मणराव,. बी. ए. १९१२–१८, श्री. पिंगळे सुब्बाराव, बी. ए. १९१२–१५, डॉ. एम. सी. नन्जुन्डराव, एम. बी. सी. एम. १९१२–१५, श्री. एस. एम. पुणताबेकर १९१६–२०, श्री. जी. आर. दादास्वामीराव १९१५–१८, १९२१–२४, श्री. टी. एस.' कृष्णस्वामीराव १९१५–२१, श्री. टी, राघवराव १९१५–१८, श्री. जी. वेंकोबाराव १९१५–१८, श्री. सी. नागराज रावसाहेब, बी. ए. १९१५–२०. श्री टी. रंगास्वामिराव १९१५–२१ व एक्स–ऑफिशिओ १९२५–३१, श्री. एस. गोविंदस्वामिराव १९१५; श्री. टी. रामचंद्रराव, बी. ए. १९१८–२० व १९२३ पासून तहहयात एक्स ऑफिशिओ, श्री. प्रणतार्थिहरराव, बी ए एल. टी. १९१८–२०, श्री. एन. रामचंद्रराव १९१८–२१–१९३६–श्री. सी. भिमराव, १९२०–२४, श्री. डी. अप्पुराव, १९२०–२१, श्री. पी. त्यागराजराव, १९२०–२४, श्री. एन. चेन्नालराव ( रावसाहेब ) १९२०–२१, १९३०–३२, श्री. टी. एन. स्वामिनाथ नायग, १९२०–२१, श्री. पी. सुब्रह्मण्यराव १९२०–२४, श्री. टी. एस. कृष्णराव, बी. ए १९२१–२६, श्री. टी. एन. भिमराव, एम ए एल टी. १९२१–२३, श्री. टी. एस. शंकरराव, बी. ए. १९२१–२४ रा. सा. टी. हरिराव, बी. ए. १९२१–३०, श्री. एन. आर. केदारिराव, एम. ए. एल् . टी. १९२१–२४ व १९२५ पासून तहहयात एक्स–ऑफिशिओ श्री. अर्णी सुब्बराव, बी. ए. १९२४–३६, १९३३, श्री. आर. वेंकटराव, बी. ए. १९२४–३३, श्री. आर. कृष्णराव, बी. ए. बी. एस. १९२४–३०, १९३३ रा. ब. आर. कृष्णराव भोसले १९२५–३३; श्री. के. साम्ब-सदाशिवराव, बी. ए. १९२५- २६, श्री. पी. देवराजराव, १९२७–३६, श्री. पी. के. भुजंगराव, १९२९–३०, श्री. टी. एन. रामचंद्रराव, एम ए. बी. एल. १९२९–३०, श्री. ए. एस. रामचंद्रपंत, बी. ए. एल्. टी. १९३०–३६, श्री. टी. बी. सेतुराव १९३०–३६, श्रीमती तुंगाबाई, १९३२ पासून तहहयात एक्स–ऑफिशिओ, श्री. टी. एस. सुन्दरराव १९३३–३६, श्री. व्ही. एम. एकाबरराव, बी. ए. १९३३–३६, श्री. टी. आप्पाजीराव, बी. ए. बी. एल् १९३३—, श्री. एन. गोपाळ कृष्णराव, बी. ए. १९३३–३६; श्री. ए. एस. कृष्णराव एम. ए. १९३३–३६ डॉ. एन जीवण्णराव, एल. एम. पी. १९३३–३६, श्री. टी. वासुदेवराव, बी. ए. १९३३–३६, श्री. आर. माधवराव बी. ए. १९३४ पासून तहहयात एक्स–ऑफिशिओ; श्री. टी. ए. एस. पद्मनाभराव बी. ए. १९३६—; श्री. टी. रामराव, १९३६—; श्री. टी. व्ही. शंकरराव, बी. ए. १९३६— श्री. जी. कृष्णराव, १९३६—, श्री. आर. एच. रंगराव, एम. ए. १९३६—; श्री. टी. व्ही. सुब्बाराव, श्री. बी. ए. बी. एस. १९३६.

## डायरेक्टर ( परगांवचे )

श्री. एन. रामराव, तिनेवेल्ली, १९१२–१५, श्री. टी. साबमूर्तिराव, बी. ए. बी. एल. तंजावर, १९२०–२१, श्री. व्ही. मल्हारिराव, तंजावर, १९१२–१५, श्री. के. टी. चन्द्रशेखरराव, कुलितलई, १९१२–१८, श्री. एम. व्ही. भगवतराव, कोइलपट्टी, १९१२–

२१, श्री. एस. मल्हारिराव, बी. ए. कासारे, १९१२–१५, श्री. टी. शिवाजीराव, बी. ए. बी. एल. श्रीरंगम्, १९१२–२०, रा. ब. जी. निवासराव, मदुरा, १९१२–१५, श्री. खजाना वेंकोबाराव, मदुरा, १९१२–१५, श्री. एम. विनायकराव, बी. ए. कलकत्ता, १९१२–१८, श्री. एम. शंकरराव, तंजावर, १९१५–२१, श्री. टी. टी. भवानिस्वामिराव बी. ए. एस. टी. त्रिवादी, १९१५–२०, श्री. एस. सेतुरामराव, बी. ए. कलकत्ता, १९१५–२०; श्री. सुब्रह्मण्यराव, बी. ए. एस. पटुकोटाई, १९१५—श्री. सी. गोमाजीराव बी. ए. बी. एल. नरसरोपेठ, १९१५–२१, श्री. व्ही. व्ही. पाटणकर, बी. ए. एल. सी. ई. येदातूर १९१५–२०, श्री. आर. श्रीनिवासराव, कडप्पा, १९१८–२०, श्री. टी. के. नागराजराव, बी. ए. एल्. टी. तंजावर १९१८–२५, श्री. पी. एस. माधवराव, मुंबई, १९२०–२५; श्री. एल. विश्वनाथराव तंजावर, १९२०–२१, श्री एन्. लक्ष्मणराव, त्रिवेन्द्रम्, १९२०–२६; श्री. सी बाळाजीराव, एम्. ए. बी. एल. कोइमतूर, १९२०–३०, श्री. टी. एस. जी.. भटगोस्वामी, त्रिवादी, १९२०—, श्री. टी डी. वेदाजीराव, बी. ए. अनंतपूर १९२०–३०, श्री. टी. आर. रघुनाथराव, माथावरम्, १९२०–३०; श्री. आर. सुब्बाराव, बी. ए. बी एल त्रिची. १९२१–२५, १९३०–३६, श्री. व्ही. शामराव, बी. ए. कडप्पा, १९२१–३०, श्री एस. कृष्णराव, कर्नूल १९२१–३३, रा. ब. एम. आर. गोविंदराव, मदुरा, १९२४–२७, श्री टी एस. लक्ष्मणराव, म्हैसूर (एक्स–ऑफिशिओ) १९२४–३२, श्री के. वेंकटराव, त्रिवेन्द्रम् (एक्स–ऑफिशिओ) १९२४–३७; श्री. टी. पद्मनाभराव, त्रिवेन्द्रम् (१९२५ पासून तहहयात एक्स–ऑफिशिओ) श्री. के. गोपाळराव, तंजावर, १९२७–३६, श्री. टी. आर भीमसेनराव, बी. ए जम्मलमडुगु, १९२७–३०, श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे चीफ ऑफ इचलकरंजी, (१९२८ पासून तहहयात एक्स–ऑफिशिओ) श्री. जी. कृष्णराव, मदुरा, १९३०–३३, श्री. ई. राजारामराव, एम ए ए. कलकत्ता, १९३०—, श्री व्ही. पी. माधवराव, सी. आय. ई. बंगलोर १९३०–३३, श्री टी. डी कृष्णराव नेल्लोर, १९३०–३३ रा. सा. सी. पुरुषोत्तमराव, शिवगंगा, १९३०–३३, श्री. एस. आर. कुप्पुराव, एरोड. १९३०–३३, श्री. पी. एस. जीवनराव, एम. ए. कोइमतूर, १९३०–३३, श्री. ए. परशुरामराव, बी. ए बी. एल, प्रोदतूर. १९३०–३३, श्री. एन. आर. केदारीराव, एम. ए. एल. टी. कुम्भकोणम् १९२९–३६; (१९२५ पासून तहहयात एक्स–ऑफिशिओ) श्री. के. एन. आण्णाजीराव, बी. ए. बी. एल. कोइमतुर, १९३५–३३, श्री. एन. रामचंद्रराव, कोटागिरी १९३३–३६ श्री. एस. लक्ष्मणराव, तंजावर, १९३५–३३, डॉ टी. हरिराव, एल. एम. पी. ब्रह्मदेश, १९३३–३६, श्री. सी. पी. कृष्णराव, जी. डी. ए. चितूर, १९३३–३६; श्री. डी. के. श्रीनिवासराव, एम. ए बी. एल. बन्हाणपूर १९३३–३६, श्री. पी. सखारामराव. बी. ए. बी. एल, त्रिवेन्द्रम्, १९३३—; श्री. टी. गोविन्दराव बंगलोर, १९३३–३५, श्री. खजाना बापुराव, मदुरा, १९३३–३६, श्री. एन. रामचंद्रराव, त्रिचनापल्ली १९३३–३६, श्री. एम. आर. निवासराव, भद्रावती, १९३६—, श्री. टी. के. बापुराव, तंजावर, १९३६ —श्री. टी. एस. निवासराव, बी. ए. बी. एल. तिनेवेली, १९३६—; श्री. टी. लक्ष्मणराव, बी. ए. डी. आय. सी. कोइमतूर, १९३६—, श्री. सी. श्रीनिवास रावसाहेब, बी. ए. बी. एल. मदुरा, १९३६—, श्री. व्ही. व्ही. चितळे, नागपूर १९३६—श्री. टी. व्ही. नरसिंगराव, टेक्काली, १९३६—, डॉ. ए. एम. पाटणकर, रंगून, १९३६—, श्री. एन. केशवराव, बी. ए. बी. सी. ई. तंजावर, १९३६—;

## म. ए. फंडाकडून शिष्यवृत्त्या मिळालेलें विद्यार्थी

( माजी व सध्यांचे )

| विद्यार्थ्याचें नाव | जन्मतारीख | शिक्षण (शिष्यवृत्ति सुरू होण्याचे वर्ष पहिल्यानें दिले आहे | पुढील आयुष्यक्रम | स याचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| टी. आर. लक्ष्मणराव, बी. ए. एल टी. | ४-६-१८९७ | प्रेसिडेन्सी कॉलेज, मद्रास १९१३-१७ बी ए ( १९१७ ) | (१) गणिताचे शिक्षक, के. व्ही. स्कूल, विरुद्धनगर (२) शिक्षक, कल्याणसुन्दरम् हायस्कूल, तजावर. नुकतेच डॉक्टरच्या सल्ल्यावरून सेवानिवृत्त झाले | १४४, देवाजीराव लेन, वेस्ट मेन स्ट्रीट, तजावर. |
| टी. प्रणतार्थिहरराव, बी. ए. एल. टी | —— | मद्रास येथील कॉलेजात १९१३-१५ बी. ए. ( १९१५ ) | (१) शिक्षक, नॅशनल हायस्कूल, नागापट्टम् (२) शिक्षक, हिंदू हायस्कूल, त्रिप्लिकेन (३) सरकारी नोकरी, सध्या जिंजी येथे डे. इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स (४) १९१८-२० फडाचे डायरेक्टर होते. | डेप्युटी इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स जिंजी. |
| सूयश अंबाजीराव, बी. ए | १-७-१८९६ | ख्रिश्चन कॉलेज, मद्रास, इटर ( १९१३ ) रजेवर असताना निजाम कॉलेज हैदराबाद येथून बी. ए. (१९३३) | (१) शिक्षक, म्युनिसिपल हायस्कूल, कर्नूल (२) सरकारी नोकरी, रेजिस्ट्रेशन खाते(१९१८ पासून ) (३) सब-रजिस्ट्रार (१९२१) | सब-रजिस्ट्रार, नद्याल. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| डी. एन. भीमराव, एम. ए. एल. टी. | १८९७ | प्रेसिडेन्सी कॉलेज, मद्रास ( १९१४-१९ ) ( इन्टर, पहिला वर्ग, बी. ए दुसरा वर्ग ) कॉलेजात सरकारी शिष्यवृत्तीही मिळे. रामकृष्ण स्टूडन्ट्स् होममध्ये राहात असत एल. टी. ( १९२० ) | (१) सरकारी नोकरी, सब असिस्टट इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स (१९२०) (२) सरकारी नोकरी, शिक्षक, सरकारी मुहामेडन हायस्कूल, मद्रास (३) सरकारी नोकरी, शिक्षक, मॉडेल हायस्कूल, सैदापेट (४) गिंडी एंजिनियरिंग कॉलेजात गणिताचे अॅ लेक्चरर. (५) गव्हर्मेंट मुहामेडन कॉलेज मद्रास अ. लेक्चरर. | कचेरी रोड, मैलापूर. |
| एन. व्ही. गोविंद्राव | ---- | वेस्ले, कॉलेज, मद्रास, इन्टर १९१४ रामकृष्ण स्टूडन्ट्स् होममध्यें राहात असत. | (१) कारकून, डी.आय. जी. पोलिस,मद्रास (२) सरकारी नोकरीचा राजिनामा देऊन मुंबईस एका व्यापारी कचेरींत शॉर्ट हॅण्ड टाइपिस्ट. | आनन्द-भुवन, सुपारीबागरोड परळ, मुंबई. |
| एस. आर. कुप्पाराव, बी. ए. एल. टी. | ---- | अमेरिकन कॉलेज मदुरा, इन्टर १९१४ | (१) शिक्षक, बोर्ड हायस्कूल, धारापुरम् फंडाचे डायरेक्टर १९३०-३३ | ---- |
| ए. गोपाळ कृष्णराव | ---- | वेस्ले कॉलेज, मद्रास, इन्टर १९१५ | (१) मद्रास पोस्टल ऑडिट कचेरींत कारकून (२) सध्या बदली होऊन रंगूनला आहेत. | ऑडिटर, ऑफिस ऑफ दि डी. ए. जी. पोस्टस् ॲण्ड टेलिग्राफ्स, रंगून |
| के. राजारामराव, बी. ए. बी. एल. | ---- | अमेरिकन कॉलेज, मदुरा, इन्टर १९१५-१६ | वारले. | ---- |
| व्ही. सर्वोत्तमराव, बी. ए. बी. एल. | २२-५-१८९९ | महाराजा कॉलेज, त्रिवेन्द्रम् (१९१५-१९ ) बी. ए. ( १९१९ ) लापा मेमोरिअल प्राइझ त्रिवेन्द्रम् लॉ कॉलेज, बी. एल्. | वकील, राणीपेठ | राणीपेठ, नॉर्थ अर्काट जिल्हा |

| विद्यार्थ्यांचे नाव | जन्मतारीख | शिक्षण (शिष्यवृत्ति सुरु होण्याचे वर्ष पहिल्यानें दिले आहे) | पुढील आयुष्यक्रम | सध्याचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| टी. एस. राजगोपाळराव बी ए | —— | पाच्यपा कॉलेज मद्रास ( १९१५–१९ ) बी ए ( १९१९ ) | सब–रजिस्ट्रार | सब-रजिस्ट्रार, किलापलूर त्रिची जिल्हा. |
| डॉ. एम. रामचंद्रराव बी ए.एम. बी. बी.एस | —— | प्रेसिडेन्सी कॉलेज मद्रास ( १९१६–१८ ) बी. ए ( १९१८ ). एम. बी बी एम. ( १८२५ ) म्हैसूर सरकारने बाल्टिमोर, यू एस. ए येथे वैद्यकीय अभ्यासासाठीं शिष्यवृत्ती देऊन पाठविले होते. | म्हैसूर स्टेट मेडिकल सर्व्हिस | —— |
| डॉ श्रीनिवासराव बी.ए.एल.टी. | —— | ख्रिश्चन कॉलेज मद्रास ( १९१६–२० ) बी ए. ( १९२० ) | (१) शिक्षक, बोर्ड हायस्कूल, नन्दालूर | बोर्ड हायस्कूल, नन्दालूर |
| टी. एस. सुब्रम्हण्यराव | १५-५-१९०२ | अमेरिकन मिशन हायस्कूल, मदुरा ( १९१६ ) | (१) कांहीं दिवस पोस्टांत नोकरी. (२) शिक्षक, सेंट मेरीज हायस्कूल, मदुरा. | १०, कृष्णराजपुरम् मदुरा. |
| के. रंगस्वामीराव | १९-५-१८९७ | सेन्ट, जोसेफ्स् कॉलेज त्रिचनापल्ली, इन्टर. ( १९१६ ) | (१) कारकून, तालुका ऑफिस, त्रिचनापल्ली | तालुका ऑफिस, त्रिचनापल्ली |

| विद्यार्थ्याचे नाव | जन्मतारीख | शिक्षण (शिष्यवृत्ति सुरू होण्याचें वर्ष पहिल्यानें दिले आहे) | पुढील आयुष्यक्रम | सध्याचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| के. शारङ्गपाणिराव, बी.ए. | १५-३-१९०२ | एस. पी. जी. कॉलेज, त्रिचनापल्ली, ( १९१९ ) बी. ए. १९२१. | (१) सैदापेट कलेक्टर कचेरींत कारकून. | २, कोरीस गार्डन्स न्यू माम्बलम् |
| ए. एस. कृष्णराव, एम.ए. | २-४-१९०३ | पाच्यपाचें कॉलेज, इन्टर १९१९ प्रेसिडेन्सी कॉलेजातून बी. ए. (१९२५) पे. कॉलेजात फ्री स्कॉलर व बी. ए. च्या परीक्षेंत संस्कृत घेऊन पहिल्या वर्गांत पहिले आले, व युनिव्हर्सिटींत चार पदकें मिळालीं, युनिव्हर्सिटींत संशोधनाचें काम १९२८ पर्यंत केले. | ( १ ) संस्कृत लेक्चरर, लायोला कॉलेज (१९२८) मद्रास, अन्नमलाय व उस्मानिया युनिव्हर्सिटयाचे संस्कृत विषयाचे मुख्य परीक्षक. कांहीं वेळ फंडाचे दुय्यम चिटणीस. सध्या फंडाच्या स्कॉलरशिप होल्डराबद्दल मेम्बर—इन—चार्ज | 'कामधेनु' २, बाबुला रोड त्यागराज नगर, मद्रास. |
| के. शंकर नारायणराव, बी.ए. | —— | खिश्चन कॉलेज मद्रास ( १९२० ) बी. ए | (१) कस्टम्सच्या इम्पिरिअल सर्व्हिसमध्ये क्लार्क म्हणून लागले. सध्या कलकत्त्याच्या कलेक्टर ऑफ कस्टम्सचे ऑफिसात आहेत. | क्लार्क, सी. कस्टम्स ऑफिस भवानीपूर, कलकत्ता. |
| आर. शामराव, बी.ए. | —— | खिश्चन कॉलेज मद्रास ( १९२० ) बी. ए. | (१) एक्झॅमिनर ऑफ लोकल फंड अकाउन्टसचे ऑफिसात नोकरी. | चेन्गलवरय्या मुदली स्ट्रीट, त्रिप्लिकेन |
| टी. एस. गोपाळ कृष्णराव बी.ए. | १९०३ | गव्हर्न्मेंट कॉलेज, कुम्भकोणम् ( १९२० ) बी. ए. | (१) रेव्हिन्यू इन्स्पेक्टर, पट्टुकोट्टाइ (जि. तंजावर) | पट्टुकोट्टाइ. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ए. के. नरसिंगराव | | इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स, मद्रास (१९२१) जी. डी. ए. | ------ | रामकृष्णपुरम्, हौरा कलकत्ता. |
| एल. नारायणराव, बी. ए. (ऑनर्स) | —— | सेन्ट जोसेफ्स कॉलेज, त्रिचनापल्ली (१९२२–२७) बी. ए. (१९२७) | (१) टेलिग्राफ ऑफिस कालिकत येथें नोकरी | कालिकत. |
| टी. आर. भीमसेनराव बी. ए. | १९-१२-०५ | वेस्ले व प्रेसिडेन्सी कॉलेज. (१९२२) बी. ए. (१९२६) रामकृष्ण स्टूडन्ट्स होममध्यें राहात असत. | (१) कारकून, तालुका ऑफिस, जम्मलमडुग. | जम्मलमडुगु |
| के. रामराव, एल. एम. पी | १७-१२-१९०४ | मेडिकल स्कूल, तजावर (१९२२) | (१) खानसाहेब डॉ. ताजुद्दिन यांचे हाताखालीं काम (२) स्वतःची प्रॅक्टिस. | तजावर |
| टी. एल. नागराजराव, बी ए. बी. एल. | एप्रिल १९०५ | ख्रिश्चन कॉलेज, मद्रास (१९२१) बी. ए. (१९२६) | तिरुपत्तूर येथे वकिली. | तिरुपत्तूर (उत्तर अर्काट) |
| एम. वेंकोबाराव, बी. ए. | नोव्हेंबर १९०६ | प्रेसिडेन्सी कॉलेज (१९२३–२७) बी. ए. (१९२७) | (१) वेल्लोर येथील रजिस्ट्रार ऑफ को ऑपरेटिव्ह सोसायटीच्या ऑफिसात नोकरी. | ३९, अवलकारा स्ट्रीट वेल्लोर |
| एन. श्रीनिवासराव, | १५-१-१९०५ | पाच्यपाचे कॉलेज, इन्टर (१९२३) | (१) हुबळी येथें रेल्वेच्या डी. टी. एस. ऑफिसात नोकरी | हुबळी |
| टी आर. महादेवराव | १५-६-१९०७ | वेस्ले कॉलेज, इन्टर (१९२३) | (१) बी. एन. रेल्वेच्या ट्रान्सपोर्टेशन खात्यात नोकरी. | ८२–ब, मासतोला लेन, किदरपूर कलकत्ता |

| विद्यार्थ्याचें नाव | जन्मतारीख | शिक्षण (शिष्यवृत्ति सुरू होण्याचे वर्ष पहिल्यानें दिले आहे | पुढील आयुष्यक्रम | स याचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| एस. महादेवराव, बी. ए. | —— | सेन्ट जोसेफ्स कॉलेज, त्रिचनापल्ली ( १९२४ ) बी. ए. ( १९२७ ) | (१) मद्रास डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनच्या ऑफिसात नोकरी. | २–३८ युथु मुदली स्ट्रीट रायपेटा, मद्रास |
| टी. ए. एल. नागराजराव, बी. ए. | फेब्रुआरी १९०६ | नॅशनल कॉलेज, त्रिचनापल्ली ( १९२४–२६ ) | (१) कारकून गव्हर्मेंट मिडल स्कूल फॉर गर्ल्स, लिटिल कान्जीवरम् | लिटिल कान्जीवरम् |
| के. श्रीनिवासराव, बी. ए. | ३१-७-१९०७ | पाच्यपाचे कॉलेज, ( १९२४–२८ ) बी. ए. च्या परीक्षेत पहिला वर्ग मिळून युनिव्हर्सिटींत पाचवे आले, व इकॉनॉमिक्सच्या डिप्लोमा कोर्सकरिता शिष्यवृत्ती मिळाली. | (१) अकाउन्टट–जनरल, मद्रासच्या कचेरींत कारकून | ५४– श्री. गगू रेड्डी स्ट्रीट एग्मोर |
| टी. आर. गोविंदराव, बी. ए. | ६-४-१९०६ | प्रेसिडेन्सी कॉलेज ( १९२४–२८ ) बी. ए. ( १९२८ ) | (१) आसिस्टन्ट, रॉबर्टस मॅकलिन ॲण्ड को. कलकत्ता. | ३४–१, हेमचंद्ररोड, किदरपूर कलकत्ता |
| अर्णी विठ्ठलराव, | —— | तजावर मेडिकल स्कूलमध्यें एल्. एम पी. च्या अभ्यासाकरिता १९२४ सालीं. स्कॉलरशिप घेतली नाहीं. | | |

| विद्यार्थ्यांचें नाव | जन्मतारीख | शिक्षण (शिष्यवृत्ति सुरू होण्याचे वर्ष पहिल्यानें दिले आहे | पुढील आयुष्यक्रम | सध्याचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| टी. विठ्ठलराव, बी. ए. | १९०७ | ख्रिश्चन कॉलेज, मद्रास ( १९२६ ) बी. ए. च्या परीक्षेंत फिजिक्सकरिता ॲबर्टीन प्राइझ मिळालें. | (१) मेटूर डॅमवर सुपरिंटेंडिंग एजिनिअरचे कचेरींत कारकून (२) फडाच्या भाषा–कमिटीचे समासद. (१९२९-३०) | मेटूर |
| एस. सुन्दरराजराव, बी. ए | — | गव्हर्मेंट कॉलेज, कोइमतूर (१९२६-२८ बी. ए. च्या परिक्षेंत संस्कृत भाषे-करिता सुवर्णपदक मिळालें. | (१) रेव्हिन्यू इन्स्पेक्टर, कडालोर. | कडालोर |
| एम सदाशिवराव, बी.ए | २३-१-१९०९ | महाराजा कॉलेज पदुकोटा. (१९२६) मदुरा कॉलेज, बी. ए. | (१) कारकून, तालुका कचेरी, अलगुडी ( पदुकोटा स. ) | अलगुडी |
| बी. कृष्णमूर्तीराव | १८-६-१९११ | म्युनिसिपल हायस्कूल, कर्नूल ( १९२६–२९ ) येथे काची लक्ष्मीबाई शिष्यवृत्ति मिळालेले पहिले विद्यार्थी. थिआसॉफिकल कॉलेज, मदनापल्ली, इन्टर | (१) कारकून, तालुका कचेरी, कर्नूल. | कर्नूल |
| ए. के. वासुदेवराव, एल. एम. पी | — | मेडिकल स्कूल, मदुरा (१९२६) | सब–असिस्टंट सर्जन, वेल्टगरपुदुर तालुका पेलाची, | वेल्टगरपुदूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| के तुळजाराम नायाा, बी.ए. | १-६-१९१० | सेंट जोसेफ्स कॉलेज, त्रिची (१९२७-२९) बी ए इकॉनामिक्स व हिस्टरींत दुसरा वर्ग | (१) पी एन एस.अय्यर ॲण्ड क. ऑडिटर्सकडे नोकरी (२) डनलॉप रबर कपनी, मद्रासकडे नोकरी | १ कंडप्पा मुदली स्ट्रीट त्रिप्लिकेन |
| व्ही.लक्ष्मणराव | नोव्हेंबर | खिश्चन कॉलेज मद्रास (१९२७) | १९२८ मार्ली वारले. | ——— |
| सी कृष्णस्वामिराव, एम. बी. बी एस. | १९०६ | मेडिकल कॉलेज, बगलोर (१९२७) एम बी बी. एस. (१९३६) मेडिसिन-मध्ये दुसरे बक्षीस जिकले | (१) कृष्णराजेन्द्र हॉस्पिटल म्हैसूर येथे हाऊस सर्जन होते | ११८६ चामराजपुरम म्हैसूर |
| आर सेतुराव, एम्. ए. | | १९२७–३० बी ए ऑनर्स. | (१) विमा–एजन्ट | C/o अ. एजिनियर (टँक) पी. डब्ल्यू डी. एलोर |
| पी. श्रीधरराव, एम ए. | | १९२७–३५ शिष्यवृत्ती घेतली नाही. | (१) जीऑलॉजिस्ट ॲसोशिएटेट सिमेट क. लि मुबई | मुबई |
| एस. के. राघवराव | १-७ १९११ | आन्ध्र खिश्चन कॉलेज, गण्टूर, (१९२८) इन्टर १९३० | ——— | ——— |
| एन वासुदेवराव | १५-६-१९११ | महाराजा कॉलेज पदुकोटा इन्टर (१९२८) | (१) कारकुन तजावर पर्मनट फड लि. तजावर | १००२, पेटा पेरुमल स्ट्रीट तजावर |
| एम एस.नारायणस्वामीराव | २७-११ १९०७ | एंजिनिअरिंग स्कूल बगलोर (१९२८–३०) पास (१९३०) | (१) उमेदवार चामरजिन्द्र वॉटरवर्क्स, थिपेगडनाळी (२) अ ऑपरेटर चामराजसागर वॉटरवर्क्स | पोस्ट चामराजसागर V1a. बगलोर |

| विद्यार्थ्याचे नाव | जन्मतारीख | शिक्षण (शिष्यवृत्ति सुरू होण्याचे वर्ष पहिल्याने दिले आहे) | पुढील आयुष्यक्रम | सध्याचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| एन. गिरिराव | — | मेडिकल स्कूल, रायपुरम्. एल. एम. पी (१९२८) शिष्यवृत्ती घेतली नाहीं | —— | —— |
| ए. रामराव | — | पाच्यपाचे कॉलेज, ऑर्ट्स कोर्स (१९२८) | अभ्यास डॉक्टरच्या सल्ल्याने सोडला | —— |
| एम जे. कान्हेटा | ५-१-१९१३ | सेंट जोसेफ्स कॉलेज, बंगलोर, (१९२८) | (१) ज्युबिली स्टोअर्स, न्यू. मार्केट कलकत्ता नोकरी | कलकत्ता |
| एस. नागेशराव | = — | काची लक्ष्मीबाई स्कॉलर, कोइमतूर (१९२९) | —— | —— |
| सौ. सुलोचनाबाई, एल. एम. पी. | — | एल एम. पी. च्या कोर्ससाठीं १९२९ मध्ये म्हैसूर सरकारची शिष्यवृत्ती मिळाली फडाची घेतली नाहीं | (१) लेडी स अ सर्जन, सागर | सागर |
| आर. नरसिंगराव बी. ए. (आनर्स) | १२-१२ १९१० | सेंट जोसेफ्स कॉलेज, त्रिची (१९२९) बी. ए ऑनर्स १९३२ दुसरा वर्ग सर टी माधवरावाचे पहिले प्राइझ १९३० मध्ये मिळाले. | (१) शिक्षक, सेंट्रल हायस्कूल, तिरुवादी | तिरुवादी Via. तंजावर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सी एन. नरसिंगरावँ, बी. ई. | १५-६-१९०५ | इन्जिनिअरिंग कॉलेज, बगलोर (१९२९) सिव्हिल एन्जिनिअर | (१) सि. एन्जिनिअर, गॅनॉन डकर्ले ॲन्ड को बगलोर | बगलोर |
| ए. नारायणराव | —— | एम बी बी एस कोर्स, मेडिकल कॉलेज, मद्रास (१९२९) | एक टर्मनतर कॉलेज सोडले | त्रिवेन्द्रम |
| टी कृष्णराव, बी. ए. | १-७-१९११ | सीडेड डिस्ट्क्ट्स कॉलेज. अनतपूर (१९२९) बी ए १९३३. | (१) तालुका ऑफिस मदनापल्ली, नोकरी. | मदनापल्ली |
| डी. एल. रामराव बी. ए. | —— | प्रेसिडेन्सी कॉलेज, मद्रास (१९२९) | (१) अकाउन्टंट, हैदराबाद .नॅशनल इन्डस्ट्रीज फॅक्टरी, लिंगम्पली | लिंगम्पली, एन.जी.एस.आर. |
| एच. श्रीनिवासराव | —— | मदुरा कॉलेज, (१९२९) बी ए. १९३४ | (१) नोकरी, त्रिची मिल्स लि. त्रिची. | त्रिचनापल्ली |
| पी. आर. रामराव बी ए | २२-१-१९११ | सेट जोसेफ्स कॉलेज, त्रिची. बी ए. १९३१ | —— | नॉर्थ दुसरा स्ट्रीट, पदुकोटा |
| व्ही. कृष्णस्वामिराव | १-७-१९१४ | काची लक्ष्मीबाई शिष्यवृत्ति. (१९३०) नेटिव्ह हायस्कूल, व गव्हर्मेंट कॉलेज’ कुम्भकोणम् | —— | ईस्ट येन स्ट्रीट, कुम्भकोणम् |
| डॉ. सुदरराव मस्के, एम. बी. बी. एस | ७-२-१९१० | मेडिकल कॉलेज बगलोर. (१९३०) एम. बी बी. एस. (१९३५) | (१) हाऊस सर्जन, व्हिक्टोरिया हॉस्पिटल, बगलोर | १५४, नारायण पिल्ले स्ट्रीट बगलोर |

| विद्यार्थ्यांचे नाव | जन्मतारीख | शिक्षण (शिष्यवृत्ति सुरू होण्याचे वर्ष पहिल्याने दिले आहे | पुढील आयुष्यक्रम | सध्याचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| डी. राजारामराव | —— | इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स, मद्रास. ( १९३० ) बी कोर्स पास. | (१) उमेदवार, पी. एन अय्यर अॅण्ड को अकाउन्टन्टस (२) सध्या नोकरी, त्रिप्लिकेन फड लि. (३) सध्या ऑ. अकाउन्टट व मेंबर मॅ क म ए. फड | ६६ टी. पी. कोइस स्ट्रीट त्रिप्लिकेन |
| पी. नागराजराव बी.ए.( ऑनर्स ) | १९-५-१९१४ | गव्हर्मेंट कॉलेज. कोइमतूर इन्टर (१९३०-३२) सेन्ट जोसेफ्स कॉलेज, त्रिची, कॉलेज स्कॉलर (१९३५) बी ए त गणितात पहिला वर्ग व युनिव्ह र्सिटींत दुसरा नबर आला | —— | सन्कुवार स्ट्रीट, त्रिप्लिकेन |
| टी. के. रंगनाथराव, एम. ए | —— | सेंन्ट जोसेफ्स कॉलेज. त्रिची इन्टर (१९३०) सेन्ट झेविअर कॉलेज, पालम-कोटा, बी ए बी. ए त गणित व सस्कृतात पहिल्या वर्गात पहिला व इग्र जींत दुसरा वर्ग मिळाला एम ए. तही असेच नैपुण्य दाखविले | (१) शिक्षक,लॉयोला कॉलेज(१९३६ ३७) | C/o टी. के. दत्तारिराव मायनर इरिगेशन ओव्हरसीयर शकरनैनार कोइल |
| डी. बी नरसिंगराव, बी. एस. सी | १४-२-१९१३ | पाच्यप्पा कॉलेज इन्टर (१९३०) ख्रिश्चन कॉलेज, बी ए | (१) मद्रास सर्व्हिसेस कमिशनची परीक्षा पास झाले | १।४६ एस. एम. व्ही.कोइल स्ट्रीट, त्रिप्लिकेन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एस. श्रीनिवासराव | १५-५-१९१६ | कान्ची लक्ष्माबीई स्कॉलर (१९३१ ३३) हिंदू हायस्कूल, त्रिप्लिकेन. कॉलेज शिक्षणासही मदत मिळाली. | (१) मेसर्स—रागणेकर व पालेकर, मुबई याचेकडे नोकरी | १४, न्यू गाजावाला बिल्डिंग आर्थररोड, ताडदेव, मुबई |
| आर. नारायणराव, बी.ए | ऑक्टोबर १९१२ | ख्रिश्चन कॉलेज मद्रास,(१९३१) | (१) बँक ऑफ हिंदुस्थान, मद्रासकडे नोकरी | १।१४ नॉर्थ माडा स्ट्रीट, मैलापूर |
| आर. कृष्णस्वामीराव, बी. ए (ऑनर्स) | ३-१-१९१३ | महाराजा कॉलेज ऑफ सायन्स, त्रिवेंद्रम (१९३१) | (१) नोकरी, युनायटेड इन्डिया लाइफ इन्शुअरन्स क लि. मद्रास | १७, परिपूर्ण विजयागर कोइल स्ट्रीट, मैलापूर |
| एस कृष्णस्वामिराव बी ई | ५-१२-१९१२ | एंजिनिअरिंग कॉलेज गिन्टी (१९३१) बी ई १९३५ | (१) पालिवासल हायड्रो इलेक्ट्रिक वर्क्समध्ये प्रॅ. ट्रेनिंग | १४, राजगोपाळविलास मानारगुडी |
| व्ही. अरुणाचलम्, बी. ए (ऑनर्स) | ——— | लायोला कॉलेज (१९३२) कॉलेज शिष्यवृत्ति मिळाल्यामुळे फडाची शिष्यवृत्ति घेतली नाही बी ए त (१९३७) गणितात पहिल्या वर्गात पहिले आले. | (१) शिक्षक, लायोला कॉलेज | लायोला कॉलेज, मद्रास |
| जे. कृष्णराव, बी ए. | १३-६-१९१२ | मद्रास मेडिकल कॉलेज (१९३२) सध्या चौथे वर्ष एम बी. बी एस | ——— | ३।१ शैव मुठिया मुदली स्ट्रीट, जॉर्ज टाऊन, मद्रास |
| टी. आर. कमलाकरराव, एल एम पी | १०-३-१९१४ | रॉयपुरम् मेडिकल स्कूल (१९३२) एल एम पी (१९३५) | (१) ऑ. हाउस सर्जन, गव्हर्मेंट हॉस्पिटल, रॉयपुरम (२) डॉ. एम. देवाजीराव, त्रिप्लिकेन याचे असिस्टट. | २०।९ चेन्गालवरय्या मुदली स्ट्रीट, त्रिप्लिकेन |

| विद्यार्थ्यांचे नांव | जन्मतारीख | शिक्षण (शिष्यवृत्ति सुरू होण्याचे वर्ष पहिल्याने दिले आहे) | पुढील आयुष्यक्रम | सध्याचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| टी. के. महादेवराव, बी.ए. | २६-९-१९१६ | फिन्डले कॉलेज, मानारगुडी, इन्टर (१९३२-३४) सेन्ट जोसेफ्स कॉलेज, त्रिची, बी ए (१९३४ ३६) बी.ए १९३६ | (१) केदार ॲण्ड को यांचेकडे नोकरी (२) मद्रास हायकोर्टात कारकून | कुप्पु मुठु मुदली स्ट्रीट त्रिप्लिकेन |
| टी. एन. बाळाजीराव | २७ ७-१९१६ | बगलोर एजिनिअरिंग स्कूल [१९३२] उच्च इलिक्ट्रिकल एन्जिनिआरिंगचा कोर्स | —— | टूमकूर |
| ए. व्ही सदाशिवराव | ११-१२-१९१८ | कान्ची लक्ष्मीबाई स्कॉलर (१९३३) मॅट्रिक (१९३५) इन्टर (१९३७) प्रेसिडेन्सी कॉलेज मद्रास येथे आर्ट्स कोर्स | —— | त्रिप्लिकेन |
| के. के. क्षिरसागर | ३१-१२-१९१५ | कॉलेज ऑफ कामर्स, मद्रास आ. ए. कोर्स ( १९३३ ) ज्युनिअर परीक्षा पास झाले | (१) त्रावणकोर नॅशनल बँकेत नोकरी. | त्रावणकोर नॅशनल बॅंक लि., बगलोर |
| व्ही कृष्णमूर्तिराव | १५-७-१९१५ | रॉयपुरम् मेडिकल स्कूल, एल एम पी कोर्स ( १९३३ ) सध्या शेवटचे वर्गात आहेत. | —— | ११, बॅरॅक्स स्ट्रीट, जॉर्ज टाउन, मद्रास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आर. राजगोपाळराव | ३-६-१९१८ | रगनाथराव मेमोरिअल शिष्यवृत्ति ( १९३३ ) सेट जोसेफ्स कॉलेज त्रिची, हायस्कूल कोर्स. | —— | 'श्रीरामविलास' पेनिन्गटनरोड तजावर |
| पिंगळे, राजारामराव | २२-७-१९१८ | प्रेसिडेन्सी कॉलेज मद्रास ( १९३५ ) गणिताचा ऑनर्स कोर्स | सीनियर बी. ए च्या वर्गांत असतानाच १९३७ मध्ये दुर्दैवाने वारले | —— |
| ए. मल्हारीराव | २८-८-१९२३ | कान्ची लक्ष्मीबाई स्कॉलर. (१९३५) के एच स्कूल तजावर, सहावी इयत्ता | —— | १८९, वेंकोबाराव लेन, राणी वैकल स्ट्रीट, तजावर |
| आर. गोपिनाथराव, बी. ए. ( ऑनर्स ) | १५ १२-१९१३ | महाराजा कॉलेज, त्रिवेन्द्रम (१९३५) बी ए १९३६. | —— | C/o वाय. नरसिंगराव, मुणुकल किलॉन, |
| के. आर. हयवदनराव | —— | ( १९३५ ) शिष्यवृत्ति घेतली नाहीं | —— | बगलोर |
| के. वेंकटरमणराव | ४-८-१९२१ | पाच्यप्पा कॉलेज इन्टर ( १९३६ ) | —— | मद्रास |
| एच. एम. सत्यनारायणराव | १०-८-२० | ,, ,, ,, ( १९३६ ) | —— | रामकृष्ण स्टुडन्ट्स होम, मैलापूर |
| टी. आर. नटराजन | १५-५-१९२० | पी टी. सी. एन टेक्निकल इन्स्टिटयूट मद्रास. इलेक्ट्रिल एजिनिअरिंग कोर्स. ( १९३६ ) | —— | —— |

LIBRARY

| विद्यार्थ्याचें नाव | जन्मतारीख | शिक्षण (शिष्यवृत्ति सुरू होण्याचे वर्ष पहिल्यानें दिले आहे | पुढील आयुष्यक्रम | सध्याचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| टी. एस. बाळुस्वामिराव | — | सेन्ट जोसेफ्स कॉलेज, त्रिची इन्टर ( १९३६ ) | — | सेन्ट जोसेफ कॉलेज, त्रिची |
| कु. द्वारकाबाई | — | मद्रास युनिव्हर्सिटी संगीत (व्हायोलिन) डिप्लोमा कोर्सचा अभ्यास ( १९३६ ) | — | — |
| के. एन. राघवेन्द्रराव | — | रंगनाथराव मेमोरिअल स्कॉलर ( १९३७ ) बिशप हेबर हायस्कूल, त्रिची. | — | — |

# दक्षिण हिंदुस्थानांतील महाराष्ट्रीय रहिवासी

लेखकः— टी. रामचद्रराव बी. ए.

[ या लेखांत लेखकानें १९०१ ते १९३१ पर्यंतच्या आपल्या समाजाच्या लोकसंख्येचें निरिक्षण केलें आहे व या तीस वर्षांत सर्व साधारण लोकसंख्या साडे आठ टक्क्यांनीं वाढली असतां आपल्या समाजाची संख्या ४-७ टक्क्यांनीं वाढली आहे असें दाखविलें आहे. आपण आपल्या प्रांतात बौद्धिक व सांस्कृतिक दृष्टया चांगलेच कार्य करीत असताना ही वस्तुस्थिति बरी आहे असें म्हणता येणार नाहीं.

या पुढें लेखकानें आपल्या समाजाच्या लोकसंख्येची वाढ कमी का होत आहे याची कारणें दाखवून ती सुप्रजाजनन दृष्टया चागल्या रितीनें वाढविण्याचे मार्ग सुचविले आहेत.

लेखाचे शेवटीं या व यासारख्या इतर प्रश्नावर विचार करण्यास व त्यावर योग्य उपाय शोधण्यास महाराष्ट्र एज्युकेशन फंडासारख्या सस्थेचा कसा उपयोग होईल हें दाखविलें आहे. —संपादक

मराठा एज्युकेशन फडाच्या रौप्य–महोत्सव–प्रसंगीं या इलाख्यांतील मराठी मायबोली असणाऱ्या लोकांच्या लोकसंख्येची कमी–अधिक वाढ, व तिचीं कारणें, याचें निरीक्षण करणें इष्ट आहे. सक्षेपाकरिता ब्राम्हण व ब्राम्हणेतर अशा सर्व महाराष्ट्रीयास प्रस्तुत लेखांत मराठे अशीच संज्ञा दिली आहे.

ही माहिती मिळविण्यास साधनें म्हणजे निरनिराळे लोकसंख्या-गणना अहवाल 'सेन्सस रिपोर्टस' इतर आंकडेवार माहिती ही होत.] खरोखर आपल्या समाजा करितां निराळे आकडे उपलब्ध असते तर ते फार उपयोगी पडले असते, पण मद्रास कॉर्पोरेशनचे आरोग्य खातें सुद्धा अशी माहिती निराळी जमा करीत नसल्यामुळें निरनिराळे समाज व संघ यांच्या माहितींतून ही माहिती काढावी लागली.

प्रथमतः मराठी हा शब्द लोकसंख्येच्या अहवालांत कोणच्या. अर्थानें वापरला जातो हें सांगितलें पाहिजे. थर्स्टन आपल्या ' दक्षिण हिंदुस्थानांतील जाती व टोळ्या ' या पुस्तकांत म्हणतो, कीं, ' १८९१ चे अहवालांत ज्या ब्राम्हणेतर जाती दक्षिणेंत पूर्वीच्या मराठी सैन्याबरोबर आल्या त्यानाच मराठी ही संज्ञा दिली आहे, परंतु दक्षिण कानडा जिल्ह्यांत 'आरे' नांवाच्या मराठी शेतकरी वर्गासही ' मराठी ' म्हटले आहे. स्टुअर्ट आपल्या ' दक्षिण कानडा मॅन्युअल ' मध्यें म्हणतो कीं, ' मराठा ' हें जातीचें नांव मराठी भाषा बोलणाऱ्या पुष्कळ जातींच्या लोकांना दिले

गेले आहे. तसेंच कोंकणी व इतर मराठी उपभाषाही मराठी या सदराखालीं घातल्या आहेत. अलिकडच्या पुस्तकांत 'शिडयूल्ड्' ( अस्पृश्य समजले जाणारे ) वर्गांत मराठी अशी एक जात त्यांच्या मराठी भाषेमुळें घातली आहे. पण या लेखांत मराठी भाषा बोलणाऱ्या सर्वांस मराठे या सदराखालीं धरण्याचें लेखकानें ठरविलें आहे.

१९११ च्या लोकसंख्येच्या अहवालांत म्हैसूर, त्रावणकोर व कोचीन, हीं सर्व संस्थानें धरून दक्षिण हिंदुस्थानांतील एकूण ६,००, ५१, ८९३ लोकांत मराठी बोलणाऱ्यांची संख्या २, ३४, १५० म्हणजे शेंकडा ०. ३८ टक्के अशी दिली आहे. तिचें पृथक्करण खालीलप्रमाणें आहे:—

| | |
|---|---|
| ( १ ) मद्रास ( ब्रिटिश मुलुख ) व पुदुकोटा, बंगनपल्ली व संदूर हीं संस्थानें | १, २९, ०७१ |
| ( २ ) म्हैसूर संस्थान ( बंगलूर सिटी व सि. स्टेशन धरून ) | ९१, ३२२ |
| ( ३ ) त्रावणकोर | ७, ०५४ |
| ( ४ ) कोचीन | ५, २१० |
| | २, ३४, १५० |

यांतील पहिल्या विभागांतील संख्येचें आणखी पृथक्करण खालील प्रमाणें कारितां येईल:—

| | | | |
|---|---|---|---|
| द. कानडा | ४७, ६३९ | रामनाड | १, ००९ |
| बल्लारी | ११, ३५० | निलगिरी | १, ३०१ |
| उ. अर्काट | ९, ९४७ | गन्तूर | ८८३ |
| तंजावर | ९, १४९ | विझगापटण | ७५१ |
| मद्रास | ७, ५६९ | गेल्लोर | ७४७ |
| अनंतपूर | ६, १७२ | कृष्णा | ७३७ |
| सेलम | ५, ९०३ | प० गोदावरी | ५२२ |
| कर्नूल | ४, ५३६ | पू. गोदावरी | ३५८ |
| चित्तूर | ३, ७८७ | तिनेवेल्ली | ३३३ |
| कोइमतूर | ३, ०९५ | गज्जम | ३१२ |
| चिंगलपट | २, ९३२ | मांडलिक संस्थानें | |
| मलबार | २, २६१ | पुदुकोटा | ६६० |
| कडप्पा | २, २०५ | | |
| त्रिचनापल्ली | २, ०३७ | संदूर | ६५१ |
| मदुरा | २, ००३ | बंगनपल्ली | १७७ |
| द. अर्काट | १, ६७३ | | |

दक्षिणेंतील इतर लोकांच्या मानानें मराठी लोकांच्या १८९१ च्या खानेसुमारी

तुलनात्मक अभ्यास केल्यास तो मनोरंजक होईल यांत शका नाहीं. व्यापार, उद्योग-धंद्याचे निमित्तानें किंवा इतर कारणानें लोक एका जिल्ह्यांतून दुसऱ्या जिल्ह्यात जात असतात; परंतु अशा स्थानान्तरांची आंकडेवार माहिती उपलब्ध नसल्यामुळें सेन्सस् रिपोर्टांवरून ही माहिती अनुमानानेंच काढावी लागत आहे.

सेन्सस रिपोर्टीत निरनिराळ्या मुलुखांतील मराठ्यांची संख्या खालील प्रमाणें दिली आहे.—

| मद्रास व मांडलिक संस्थानें | एकंदर लोकसंख्या | एकंदर शेंकडा वाढ | मराठ्यांची संख्या | शेंकडा वाढ |
|---|---|---|---|---|
| १८९१ | ३६,०६४,४०८ | | उपलब्ध नाहीं | — |
| १९०१ | ३८,६९३,५५८ | ७·१८ | ११९,०४० | — |
| १९११ | ४१,८७०,१६० | ८·३२ | १२५,१२९ | ६·७८ |
| १९२१ | ४२,७९४,१५५ | २·२६ | १२४,९८४ | १·६८ |
| १९३१ | ४७,१९३,६०२ | १०·८ | २३०,५६४ | ४ ४६ |
| म्हैसूर | | | | |
| १८९१ | ४९,४३,६०४ | — | ६५,३८७ | — |
| १९०१ | ५४,४९,८०० | १०·२४ | ७७,५९४ | १८ ७२ |
| १९११ | ५८,०६,१९२ | ६·५४ | ७८,१०९ | ०·६६ |
| १९२१ | ५९,७८,८९२ | २·९७ | ७८,३३६ | ०·२९ |
| १९३१ | ६५,५७,३०२ | ९·६७ | ९१,३३२ | १६·५७ |
| त्रावणकोर | | | | |
| १८९१ | | | | |
| १९०१ | २९,१२,२२२ | —— | ७,९८८ | |
| १९११ | ३४,२६,९४८ | १७·६५ | ६,७४० | ११ १७ |
| १९२१ | ४०,०६,०५४ | १६·९१ | २,६२९ | (?) |
| १९३१ | ५०,९५,९७३ | २७·२० | ७,०५४ | |
| कोचीन | | | | |
| १९०१ | ८१२,०२५ | १२·३ | ९२६ | — |
| १९११ | ९१८,११० | १३·१ | १०६१ | १४·५७ |
| १९२१ | ९७९,०८० | ६·६ | ३०१३ | १८३·९७ |
| १९३१ | १२०५,०१६ | २३ १ | ३२१० | ६·१४ |

वरील आंकड्यावरून असें दिसून येते कीं, मद्रास इलाख्यात १९२१ चें दशक सोडून सर्वसाधारण वाढ होत आहे. १९१८ च्या इन्फ्लुएन्झाचे साथीनें पुष्कळ लोक मृत्युमुखीं पडले.! मराठ्यांची लोकसंख्या मात्र सर्वसाधारण वेळीं वाढत असतां १९११ च्या दशकांत कमी झाली. सर्व लोकांचे मानानें मराठ्यांची वाढ कमी आहे

इतर संस्थानच्या बाबतींतही मद्रासमारखीच स्थिति आहे. फरक इतकाच कीं, ( १ ) १८९१ ते १९०१ मध्यें म्हैसूर संस्थानांत कोलार येथलि सोन्याच्या खाणी सुरू झाल्यामुळें बरेच मजूर तिकडे गेले. तसेंच १९३१ चे आधींच्या दहा वर्षांत झालेली औद्योगिक भरभराट व सारस्वत समाजाच्या इकडील भागांतील नव्या गिरण्या यामुळें मराठ्याच्या लोकसंख्येंत जास्त वाढ झाली. तसेंच 'इंडियन इंस्टिट्यूट ऑफ सायन्स, या संस्थेंत शिष्यवृत्त्या मिळालेल्हेी मराठी विद्यार्थी बाहेरून आले. ( २ ) त्रावणकोर संस्थानात मराठ्याची लोकसंख्या १९२१ सालीं बरोबर मोजली गेली नाहीं, असें म्हणतात. त्यामुळें अनुमानें काढणें योग्य होणार नाही. ( ३ ) कोचीन मधील आकड्याच्या घोटाळ्यास मातृभाषा बरोबर न सांगणें व परकीय अल्पसंख्या-कानीं स्थानिक लोकाची भाषा पत्करिणें ही कारणें होत सेन्सस रिपोर्टात असें म्हटलें आहे कीं, जे कोंकणी ब्राम्हण पूर्वी स्वतःस गौड म्हणवीत असत ते आता स्वतःची भाषा मराठी आहे असें अभिमानानें सांगतात.

तुलनात्मक दृष्टया मराठ्याच्या लोकसंख्येच्या कमी वाढीचीं कारणें काय ? हीं कम—वाढ म्हणजे सांपत्तिक सुधारणा व सौख्य याचे निदर्शक आहे कीं, जीवन-शास्त्रदृष्टया आपल्या कमकुवतपणाचें लक्षण आहे याचा विचार करू.

स्थानिक मराठ्यापैकीं किती लोक प्रात सोडून बाहेर गेले हें अजमाविणें कठीण आहे. पण असें दिसते की प्रांतातील इतर लोकांप्रमाणेंच बाहेर गेलेल्यापेक्षां प्रांतात आलेल्या लोकाची संख्या जास्त आहे. आपल्या समाजाच्या कमवाढीचें स्थानत्याग हे खरें कारण खात्रीनें नव्हे

काहीं लोक मिश्रविवाह हें कमवाढीचें कारण म्हणून दाखवितांत. मिश्र-विवाहामुळें संतती दुसऱ्या भाषेच्या गटांत दाखविली जाण्याचा फार संभव आहे. ' नेहमीं घरीं वापरली जाणारी भाषा ' म्हणून मातृभाषा १९३१ सालच्या सेन्सस मध्यें दाखविली होती म्हणून हें अनुमान संभाव्य दिसतें हें खरें. असे म्हणतात कीं मातृभाषा कोणची या प्रश्नाचें १९३१ मध्यें दिलेलें उत्तर १९२१ मध्यें दिलेल्या उत्तराशीं विसंगत होते अशीं पुष्कळ उदाहरणें आहेत. विशेषतः नवराबायकोची भाषा जेथें निरनिराळी असेल तेथें ' घरी नेहमीं वापरली जाणारी भाषा ' नवऱ्याची किंवा बायकोची कोणाचीही असूं शकेल

वर सांगितल्याप्रमाणें आपल्या कमवाढीचीं कारणें व त्यांचें कमजास्त परिणाम ठरविणें फार दुर्घट झालें आहे. परंतु असें म्हणता येईल कीं मिश्रविवाह फार थोडे होत असल्यामुळें तें कारण सोडून देऊन आपणास जनन मरणाच्या आकड्याकडेच जास्त लक्ष दिलें पाहिजे

सध्याची लोकसंख्या ही जनन व मरण या दोन्ही क्रियांचा परिणाम होय. मरणापेक्षा जन्म जास्ती झाले कीं लोकसंख्या वाढलीच पाहिजे. तसेंच उलट जर जन्मापेक्षा मृत्यु जास्त झाले की लोकसंख्या घटते. असें म्हणतां येईल कीं १९२१ चें

दशक सोडून मराठ्यांची लोकसंख्या कांहीं कमी होत नाहीं पण असें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं जीवनकलहात जगावयाचे असेल तर लोकसंख्या कमी होऊं देता कामा नये. मनुष्यप्राण्याचें जीवन स्वसंरक्षण व प्रजोत्पादन या उपजत स्वभावावर आहे. स्वसंरक्षणाच्या इच्छेमुळेंच सर्व पुढारलेले लोक मृत्यूशी झगडत आहेत. पण नुसती आयुर्मर्यादा वाढवून वंश टिकून रहात नाहीं पण वंश टिकविण्यास प्रजोत्पादनाची जरूरी आहे कीं ज्यायोगें समाज निरनिराळ्या वयाच्या लोकाचा असेल व एक पिढी नाहिशीं होत असतां त्याचे बदली दुसरी पिढी तयार असेल. प्राणिशास्त्रदृष्ट्या समाजाच्या दर्जाचें माप म्हणून ' जीवनाचें सूचक ' वापरण्यात येतें. हें सूचक म्हणजे एका विवक्षित कालामधील १०० मृत्यूंशीं जननाचें शेंकडा प्रमाण हें होय. जर याची संख्या १०० पेक्षा कमी असेल तरच लोकसंख्या वाढेल

आपण प्रथम मृत्यूमुळें लोकसंख्या कशी घटते याकडे लक्ष देऊ. हिंदुस्थानांत मनुष्याची किमान आयुर्मर्यादा फार कमी म्हणजे २६ वर्षे आहे. आणि यांचीं कारणें आर्थिकच आहेत. दारिद्र्यामुळें होणारी उपासमार हें पहिले कारण खरोखर पाहिलें असतां देशाचा विस्तार, खनिज व उद्भिज संपत्तीकडे पाहिलें असता हिंदुस्थानातील लोकसंख्या फार नाहीं पण वैयक्तिक कुटुंबातील खाणाऱ्याची संख्या व मिळवित्याची कमतरता यामुळें दारिद्र्य फार भासते दारिद्र्य घालवून रोग व मृत्यू यांचा प्रतिकार करण्याची लोकाची शक्ति वाढविणे हा महत्वाचा प्रश्न आहे

या बरोबर दिवगत होणाऱ्या लोकाची जागा भरून काढण्यासाठीं जननाचा प्रवाह चालू ठेवणें आवश्यक आहे जननाच्या प्रश्नाशीं स्त्रियाचाच विशेष संबंध येतो व त्यांची गर्भधारण करण्याची शक्ति अबाधित राखणें हें महत्वाचें आहे हिंदुस्थानात निरनिराळ्या वर्गातील व प्रांतातील ९००,००० कुटुंबाची चौकशी करतां प्रत्येक स्त्रीस सरासरी ४ जिवत मुलें जन्मून त्यातील २·९ जगतात असें आढळून आले आले. मुलांच्या ह्या लहान संख्येचें कारण संततिनियमन किंवा लग्न उशिरा होणें हें नाहीं, पण कार–सान्डर्सच्या मतें पुष्कळ स्त्रिया प्रजोत्पादनाच्या कालापूर्वींच मृत्युमुखीं पडतात हें होय याला वैद्यकीय व आर्थिक दृष्ट्या ही मातृहानि बंद करण्याचे उपाय योजले पाहिजेत.

या लेखांत लोकसंख्येच्या वाढीच्या प्रश्नाचा स्थूल मानानेंच उहापोह केला आहे. स्त्रियांची गर्भधारणा शक्ति मोजण्याच्या मार्गासारखे डॉक्टर लोकांशिवाय इतरांस न कळणारे प्रश्न अजिबात सोडून दिले आहेत तरी पण येथें आवश्यक माहिती कशी मिळविता येईल हे दर्शविण्याचा प्रयत्न करणार आहे. पूर्वीं म्हटल्या-प्रमाणें या देशात सेन्ससच्या माहितीशिवाय दुसरी साधनें जवळजवळ नाहींत असें म्हटले तरी चालेल जरूरीची आकडेवार माहिती हिंदुस्थानापेक्षा पुष्कळ सुधार-लेल्या देशातसुद्धा बरोबर उपलब्ध नसते. उदाहरणार्थ, मुलांच्या जन्माचे वेळीं आई-बापांच्या वयांची नोंद अजून कोणी करीत नाहीं. तसेंच सेन्ससच्या माहितींत दरएक

